**Groundwater harvesting tank... महाविद्यालयाच्या रासेयो विभागातील विद्यार्थ्यांनी श्रमदान करून पाणी आडवा पाणी जिरवा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास हातभार लावला.**





## १५. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन शिबिरामध्ये निवड

दि. 23 सप्टेंबर 2022

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विदयार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ठिकाणी आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन शिबिरामध्ये सहभागी होते यामध्ये शरद मोटे, शिवानी, संध्या तळतकर, सोमेश्वर सूळ यांचा समावेश होता. हे शिबिर दिनांक 23 सप्टेंबर 2022 रोजी संपन्न झाले.

यामध्ये शरद मोटे आणी संध्या तळतकर यांची निवड पुढील राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबिर कोल्हापूर या शिबिरासाठी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

## १६. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन

दि.२४ सप्टेंबर २०२२

'राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमांसाठी जाताना मी पांडुरंगाच्या दर्शनाला जाण्याच्या श्रद्धेने जातो. कारण राष्ट्रीय सेवा योजनेत काम करणारे विद्यार्थी हे खरे पांडुरंग आहेत. हे विद्यार्थी श्रम करतात. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल होतो. आणि या बदलामुळे राष्ट्रीय सेवा योजना अधिक समृद्ध होते. माझ्या २७ वर्षांच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी कार्यकाळात विद्यार्थ्यांनी मला खूप शिकवले. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मी पर्यावरण, जल नियोजन, स्वच्छता, समाज प्रबोधन, जनजागृती या क्षेत्रात काम करू शकलो. विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळेच मला अनेक सन्मान मिळाले. राष्ट्रीय सेवा योजना हे माझ्यासाठी आनंदधाम आहे. कारण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मिळणारा आनंद हा माझ्या हाती आहे' असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण व जलतज्ञ डॉ. नारायणराव बोराडे यांनी केले.

डॉ. बोराडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना जीवनगौरव पुरस्कार प्राप्त कार्यक्रमाधिकारी आहेत. त्यांनी दहा हजार झाडे लावल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना वनश्री हा पुरस्कारही दिलेला आहे. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत काम करताना अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम पूर्णत्वास नेले. र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रोफेसर रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त 'मी आणि राष्ट्रीय सेवा योजना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नारायणराव बोराडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. तर सूत्रसंचालन कु. पूजा काळे हिने केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांच्या भित्तीपत्रकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल माने यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना लक्षगीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते.




पुण्यनगरी

**राष्ट्रीय सेवा योजना माझ्यासाठी आनंदधाम : डॉ.बोराडे**

**गेवराई प्रतिनिधी:** र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त 'मी आणि राष्ट्रीय सेवा योजना' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन पूजा काळे हिने केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांच्या भित्तीपत्रकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल माने यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना लक्षगीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते.



दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
29SEP2022

# राष्ट्रीय सेवा योजना माझ्यासाठी आनंदधाम –डॉ. बोराडे

गेवराई, दि.२९ (लोकाशा न्युज):- राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमांसाठी जाताना मी पांडुरंगाच्या दर्शनाला जाण्याच्या श्रद्धेने जातो. कारण राष्ट्रीय सेवा योजनेत काम करणारे विद्यार्थी हे खरे पांडुरंग आहेत. हे विद्यार्थी श्रम करतात. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल होतो. आणि या बदलामुळे राष्ट्रीय सेवा योजना अधिक समृद्ध होते. माझ्या २७ वर्षांच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी कार्यकाळात विद्यार्थ्यांनी मला खूप शिकवले. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने मी पर्यावरण, जल नियोजन, स्वच्छता, समाज प्रबोधन, जनजागृती या क्षेत्रात काम करू शकलो. विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळेच मला अनेक सन्मान मिळाले. राष्ट्रीय सेवा योजना हे माझ्यासाठी आनंदधाम आहे. कारण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मिळणारा आनंद हा माझ्या हाती आहे' असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण व जलतज्ञ डॉ. नारायणराव बोराडे यांनी केले.

डॉ.बोराडे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना जीवनगौरव पुरस्कार प्राप्त कार्यक्रमाधिकारी आहेत. त्यांनी दहा हजार झाडे लावल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना वनश्री हा पुरस्कारही दिलेला आहे. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत काम करताना अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम पूर्णत्वास नेले. र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रोफेसर रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त 'मी आणि राष्ट्रीय सेवा योजना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नारायणराव बोराडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. तर सूत्रसंचालन पूजा काळे हिने केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या भित्तीपत्रकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षक प्रा.चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ.राहुल माने यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना लक्षगीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते.

## १७. प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिर 2022 23 मध्ये सहभागी

दि. 28 ते 30 सप्टेंबर 2022

या शिबिरात करिता विद्यापीठातून 30 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. 28 ते 30 सप्टेंबर 2022 या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय पुणे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय भारत सरकार उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिर 2022 23 मध्ये सहभागी झाले होते. या शिबिरामध्ये महाराष्ट्रातील 450 पेक्षा जास्त एनएसएस विभागाचे विद्यार्थी विद्यार्थिनी निवडीसाठी आले होते यामधून 56 विद्यार्थ्यांची निवड गुजरात या ठिकाणी सरदार पटेल विद्यापीठ वल्लभ विद्यानगर जिल्हा आनंद या ठिकाणी होणाऱ्या शिबिराकरिता निवड करण्यात आली आणि

राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 मुंबई या ठिकाणी होणाऱ्या शिबिराकरिता 38 विद्यार्थी राखीव म्हणून निवड करण्यात आली होती. यामध्ये गुजरातच्या शिबिरासाठी महाविद्यालयाचा विद्यार्थी मोटे शरद त्रिंबक याची निवड करण्यात आली होती. आणि राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 महाराष्ट्र मुंबई या ठिकाणी होणाऱ्या शिबिराकरिता राखीव म्हणून संध्या तळतकर हिची निवड करण्यात आली.

## १८. गांधीं जयंती आणि सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष

दि.१ आक्टोबर २०२२






'महात्मा ही पदवी कुठल्या विद्यापीठाने दिलेली नाही. तर समाजाने या महामानवांना ही पदवी बहाल केलेली आहे. त्यांनी सत्याचा उद्घोष केला. सत्याचा शोध घेणाऱ्या समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न केले. सत्याचा आग्रह धरायला शिकविले. त्यामुळे महात्मा जोतीराव फुले आणि महात्मा गांधी यांच्यात काळाचे अंतर असले तरी हे दोन्ही महात्मे सत्याला अग्रस्थानी मानणारे आहेत. समानता हा फुले आणि गांधी यांच्यातला समान धागा आहे. स्वातंत्र्य, बंधुतेला आपल्या विचार आणि कृतीमध्ये स्थान देणाऱ्या या महापुरुषांना विद्यार्थ्यांनी आपल्या आचरणात उतरविणे आवश्यक आहे. तरच आपण विज्ञान आणि विचारनिष्ठ समाज म्हणून प्रगती करू शकू. अन्यथा आपला विनाश अटळ आहे' असे प्रतिपादन सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. हरिदास यांनी केले. ते 'महात्मा फुले ते महात्मा गांधी' या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. अट्टल महाविद्यालय व्याख्यानमाला आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गांधीं जयंती आणि सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी हरिदास यांनी विद्यार्थ्यांशी प्रदीर्घ संवाद साधत वस्तुनिष्ठ आणि सत्याची कास धरण्याचे आवाहन केले.

हरिदास हे महाराष्ट्र राज्याचे माजी साखर संचालक असून विद्यार्थी काळापासून समाजवादी, गांधीवादी, सत्यशोधक या चळवळीशी संबंधित आहेत. सध्या ते सत्यशोधक समाजाचा पूर्णवेळ कार्यकर्ता, प्रसारक म्हणून महाराष्ट्रभर विचार यात्रा राबवत आहेत. त्या अंतर्गत अट्टल महाविद्यालयातील व्याख्यानासाठी ते उपस्थित होते.

प्राचार्य प्रोफेसर रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानाचे प्रास्ताविक अट्टल महाविद्यालय व्याख्यानमाला समितीप्रमुख तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका कु. ज्ञानेश्वरी खेत्रे हिने सूत्रसंचालन केले. कु. पूजा काळे हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर कु. हिने आभार मानले. यावेळी प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मीना नागवंशी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील भगत, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. राहुल माने, प्रा. अरुण जाधव, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब जोगदंड, डॉ. सुदर्शना बढे, डॉ. भराडे, डॉ. अमोल शिरसाठ, प्रा. शरद सदाफुले, प्रा. रेणुका संभाहेरे, प्रा. नितीन क्षीरसागर, प्रा. उदय खरात यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.







## १९. गुजरातच्या शिबिरासाठी महाविद्यालयाचा विद्यार्थी मोटे शरद त्रिंबक याची निवड

दि. 20 ते २९ नोव्हेंबर 2022

राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 मुंबई या ठिकाणी होणाऱ्या शिबिराकरिता 38 विद्यार्थी राखीव म्हणून निवड करण्यात आली होती. यामध्ये गुजरातच्या शिबिरासाठी महाविद्यालयाचा विद्यार्थी मोटे शरद त्रिंबक याची निवड करण्यात आली होती. आणि राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 महाराष्ट्र मुंबई या ठिकाणी होणाऱ्या शिबिराकरिता राखीव म्हणून संध्या तळतकर हिची निवड करण्यात आली.

पुढील शिबिर 20 ते २९ नोव्हेंबर 2022 रोजी सरदार पटेल विद्यापीठ वल्लभ विद्या नगर या ठिकाणीं आयोजित करण्यात आले होते. या शिबिराकरिता महाविद्यालयाचा विद्यार्थी शरद त्रिंबक मोटे याची निवड करण्यात आली होती हे शिबिर दहा दिवसाचे होते.

## २०. 'एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची भूमिका' कार्यक्रम संपन्न

दि.१० डिसेंबर २०२२







प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली एचआयव्ही जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. 'एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची भूमिका' या विषयावर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी सुहास कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्कंठा निर्माण करत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद रंगत गेला. एचआयव्ही - एड्स होण्यापासून स्वतःचा व इतरांचा बचाव करणे आणि जे बाधित आहेत त्यांना सामावून घेत समानतेने वागणूक देणे हे आशयसूत्र संवाद कार्यक्रमाचे होते.

याप्रसंगी गेवराई उपजिल्हा रुग्णालयाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ विक्रम तिडके यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सोमेश्वर सूळ या स्वयंसेवकांने सूत्रसंचालन केले तर कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले. या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल माने, प्रा. राहुल लगड यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रकाश आधार

संपादक – सुनिल पोपळे PRAKASH ADHAR

PRN NO. L/18/RNP/15/BEED/2020-22 E-Mail : prakashaadhar2019@gmail.com

## अट्टल महाविद्यालयात 'एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची भूमिका' कार्यक्रम संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली एचआयव्ही जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. 'एड्स प्रतिबंधामध्ये युवकांची भूमिका' या विषयावर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी सुहास कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्कंठा निर्माण करत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद रंगत गेला. एचआयव्ही – एड्स होण्यापासून स्वतःचा व इतरांचा बचाव करणे आणि जे बाधित आहेत त्यांना सामावून घेत समानतेने वागणूक देणे हे आशयसूत्र संवाद कार्यक्रमाचे होते.

याप्रसंगी गेवराई उपजिल्हा रुग्णालयाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ विक्रम



तिडके यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सोमेश्वर सूळ या स्वयंसेवकांने सूत्रसंचालन केले तर कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले. या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. राहुल माने, प्रा. राहुल लगड यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २१. राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात 3 विद्यार्थ्यांचा सहभाग

दि. १९ ते २८ डिसेंबर २०२२

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तीन स्वयंसेवक जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी जळगाव विद्यापीठ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आव्हान राज्यस्तरीय शिबिरात सहभागी झालेले होते. यातील शिवानी भुईभार, सिद्धेश्वर राऊत, संध्या तळतकर या सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, ज्योती खरात आदींची उपस्थिती होती.

दिव्य मराठी बीड जिल्हा 01-01-2023

### गेवराईच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय शिबिरात यशस्वी सहभाग नोंदवल्याबद्दल अट्टल विद्यालयात विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**प्रतिनिधी** | गेवराई

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तीन स्वयंसेवकांनी राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात यशस्वी सहभाग नोंदवला.

जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी जळगाव विद्यापीठ येथे हे राज्यस्तरीय शिबिर पार पडले. यातील शिवानी भुईभार, सिद्धेश्वर राऊत, संध्या तळतकर या सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य रजनी शिखरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, ज्योती खरात आदींची उपस्थिती होती. या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ द्वारे अपघातग्रस्ताला करावयाची प्राथमिक स्वरूपाची मदत, प्रथमोपचार, आपत्तीत सापडलेल्यांसाठी रेस्क्यू टेक्निक्स, स्विमिंग टेक्निक्स आणि युज ऑफ फ्लोटिंग डिव्हाइसेस, आय. आर. बी. बोट हँडलिंग, फायर रेस्क्यू टेक्निक्स, पेशंट लिफ्टिंग अँड मूवीग टेक्निक्स, लँड स्लाईड, सायक्लोन अँड त्सुनामी, हाय राईस इक्विपमेंट्स, रोप-रेस्क्यू टेक्निक्स इत्यादी बाबींचे एन.डी.आर.एफ.च्या तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रात्यक्षिकासहित प्रशिक्षण देण्यात आले. बीड जिल्ह्याच्या संघ व्यवस्थापकाची जबाबदारी सुंदरराव सोळुंके महाविद्यालयाच्या डॉ. नितीन ढवळे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ द्वारे अपघातग्रस्ताला करावयाची प्राथमिक स्वरूपाची मदत, प्रथमोपचार, आपत्तीत सापडलेल्यांसाठी रेस्क्यू टेक्निक्स, स्विमिंग टेक्निक्स आणि युज ऑफ फ्लोटिंग डिव्हाइसेस, आय. आर. बी. बोट हँडलिंग, फायर रेस्क्यू टेक्निक्स, पेशंट लिफ्टिंग अँड मूवीग टेक्निक्स, लँड स्लाईड, सायक्लोन अँड त्सुनामी, हाय राईस इक्विपमेंट्स, रोप-रेस्क्यू टेक्निक्स इत्यादी बाबींचे एन.डी.आर.एफ.च्या तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रात्यक्षिकासहित प्रशिक्षण देण्यात आले.

या शिबिरात राज्यभरातून सुमारे १७८ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातून विविध महाविद्यालयातून २० स्वयंसेवकांनीही या शिबिरात सहभाग नोंदवला. बीड जिल्ह्याच्या संघ व्यवस्थापकाची जबाबदारी सुंदरराव सोळुंके महाविद्यालयाच्या डॉ. नितीन ढवळे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## २२. ४२० प्रजातींची २००० झाडे- राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या प्रयत्नांचे यश

दि.९ जानेवारी २०२३

दिव्य मराठी

# बीड जिल्हा

बीड, सोमवार, ९ जानेवारी २०२३

### 'क्यूआर' कोडच्या माध्यमातून गेवराईत झाडे लागली बोलायला

मंडे पॉझिटिव्ह

विनोद नरसाळे | गेवराई

झाडाची संपूर्ण माहिती, त्याचे उपयोग, त्या झाडांचे महत्त्व, फायदे आदी बाबी जाणून घेण्यासाठी गेवराई येथील र.भ.अट्टल महाविद्यालयाने अभिनव उपक्रम राबवून झाडावर 'क्यूआर कोड' विकसीत केला आहे. या 'क्यूआर' कोडच्या माध्यमातून 'टॉकिंग ट्री' म्हणजेच झाडेच बोलायला लागली आहेत. झाडांवर चिटकवलेले क्यूआर कोड मोबाईलवर स्कॅन करताच झाडे स्वतः बद्दलची माहिती देत आहेत.

झाडांच्या विविध प्रजाती आहेत. त्यामुळे बहुतांश जणांना या प्रजातीची माहिती नसते. काही झाडे पाहताच आकर्षक करतात. हे झाड कोणत्या प्रकारचे आहे, या झाडांची माहिती नाव का ? असे प्रश्न नेहमीच पडतात. मात्र हे झाड आपल्याला सहजासहजी ओळखता यावे, त्याची माहिती अवगत व्हावी,

या झाडांना त्यांची माहिती स्वतः देता यावी या उद्देशाने क्यू आर कोड या झाडांना बसविण्यात आली आहेत. महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश करताच हि झाडे व त्यावरती लावण्यात आलेले क्यूआर कोड लक्ष वेधून घेत आहेत. क्यू आर कोडच्या माध्यमातून आता झाड स्वतःबद्दलची माहिती स्वतःच देत आहेत. येथील महाविद्यालयात झाडांची विशेष काळजी घेतली जाते. यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे.

झाडांना पाणी देण्यापासून त्यांची जोपासना केली जाते. यामुळे महाविद्यालयाचा परिसर झाडांनी अक्षरशः फुलून गेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सानिध्यात अभ्यास करता यावा म्हणून ओपन स्टडी ची व्यवस्था देखील करण्यात आली असून विद्यार्थी या निसर्गाच्या सानिध्यात अभ्यास करताना दिसतात.

र. भ. अट्टल महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम, ५० वनौषधींची झाडे, परिसर फुलला

#### ४२० प्रजातींची २ हजारांहून अधिक झाडे

महाविद्यालयाच्या प्रांगणात २ हजारांहून अधिक ४२० वेगवेगळ्या प्रजातीची झाडे असून ७५० झाडांना क्यू आर कोड डकविण्यात आले आहेत. कॉलेजच्या आवारात औषधी वनस्पतींची नर्सरी तयार करण्यात आली आहे. यामध्ये ५० औषधी वनस्पती असून या वनस्पतीचे मानवी शरीराला फारच मोठे फायदे आहेत.



आर बी अटल महाविद्यालयात अशा प्रकारे झाडांना क्यू आर कोड बसवले गेले आहेत.

#### सहज मिळते माहिती

- 'टॉकिंग ट्री' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या आवारात वेगवेगळ्या प्रजातीच्या झाडांवर हे क्यू आर कोड लावण्यात आली आहेत. त्यामुळे विविध प्रजातींची झाडे मोबाइलद्वारे ओळखता येऊ शकणार आहे. प्रत्येक प्रजातीची सविस्तर माहिती विद्यार्थी व येथे येणाऱ्या प्रत्येकांना यापुढे उपलब्ध होणार आहे.

- डॉ.रजनी शिखरे, प्राचार्या

## २३. वाहतूक सुरक्षा

दि. १२ जानेवारी २०२३

'वाहनधारकांनी वाहतुकीच्या पंचसूत्रीचे पालन करावे, त्यामुळे अपघात होणार नाही. त्यामुळे अपघातातून होणारी जीवितहानी किंवा अपंगत्व येणार नाही. आज देशासमोर अपघातांमध्ये मृत्यू आणि अपघातामुळे येणारे अपंगत्व यांची फार मोठी समस्या आहे. जगात प्रथम क्रमांकावर अपघातग्रस्त देश म्हणून भारताचे नाव येणे हे भूषणावह नाही. त्यामुळे वाहतुकीची पंचसूत्री ज्यामध्ये दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर, चारचाकी चालवताना सीटबेल्टचा वापर, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे टाळणे, नशापान करून वाहन चालवू नये आणि वाहनाच्या गतीचे निर्बंध पाळावेत ही पंचसूत्री जर आपण पाळली तर वाहनांच्या सुरक्षिततेपेक्षा नियमांना अनुसरून वाहने चालवली तर अपघात कमी होतील. आणि अपघात झाला तरी जीवितहानी होणार नाही याची खात्री असते' असे प्रतिपादन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल माने यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'वाहतूक सुरक्षा' या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी मोटार वाहन निरीक्षक शंकर कराळे आणि प्रवीण भोसले, तसेच सह मोटार वाहन निरीक्षक योगेश खडे, अक्षय काळे, प्रदीपकुमार बिराजदार यांच्यासह ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनचे संघटक शेख मन्सूर, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. राहुल माने आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. त्यांनी उपस्थितांना वाहतूक सुरक्षेची शपथ दिली. यावेळी दिपाली लाड या विद्यार्थीने बनवलेल्या राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची याप्रसंगी उपस्थिती होती.







दिव्य लोकप्रभा
Mon 16-01-2023
Page No. 3

## वाहतुकीच्या पंचसूत्रीचे पालन करावे–आरटीओ स्वप्निल माने

काझी अमान । गेवराई

'वाहनधारकांनी वाहतुकीच्या पंचसूत्रीचे पालन करावे, त्यामुळे अपघात होणार नाही. त्यामुळे अपघातातून होणारी जीवितहानी किंवा अपंगत्व येणार नाही. आज देशासमोर अपघातांमध्ये मृत्यू आणि अपघातामुळे येणारे अपंगत्व यांची फार मोठी समस्या आहे. जगात प्रथम क्रमांकावर अपघातग्रस्त देश म्हणून भारताचे नाव येणे हे भूषणावह नाही. त्यामुळे वाहतुकीची पंचसूत्री, ज्यामध्ये दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर, चारचाकी चालवताना सीटबेल्टचा वापर, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे टाळणे, नशापान करून वाहन चालवू नये आणि वाहनाच्या गतीचे निर्बंध पाळावेत ही पंचसूत्री जर आपण पाळली आणि वाहनांच्या सुरक्षिततेपेक्षा नियमांना अनुसरून वाहने चालवली तर अपघात कमी होतील. आणि अपघात झाला तरी जीवितहानी होणार नाही याची खात्री असते' असे प्रतिपादन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल माने यांनी केले.मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील अट्टल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'वाहतूक सुरक्षा' या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य प्रो. रजनीताई शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी मोटार वाहन निरीक्षक शंकर कराळे आणि प्रवीण भोसले यांच्यासह मोटार वाहन निरीक्षक योगेश रबडे, अक्षय काळे, प्रदीपकुमार बिराजदार, ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशनचे संघटक शेख मन्सूर, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. राहुल माने आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. त्यांनी उपस्थितांना वाहतूक सुरक्षेची शपथ दिली. यावेळी दिपाली लाड या विद्यार्थिनीने बनवलेल्या राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी–विद्यार्थिनींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## २४. राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन - महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांचा समावेश

दि. 17 ते 26 जानेवारी 2023






महाराष्ट्रातील एकूण 56 विद्यार्थ्यांपैकी 14 विद्यार्थ्यांची निवड 26 जानेवारीच्या कर्तव्यपथवर होणाऱ्या पतसंस्थेलनाकरिता निवड करण्यात आली आणि उर्वरित सर्व एनएसएस च्या विद्यार्थ्यांची निवड राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 मुंबई शिवाजी पार्क या ठिकाणी होणाऱ्या संचलनाकरिता करण्यात आली यामध्ये महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांचा समावेश होता शरद त्रिंबक मोटे आणि सध्या तळतकर यांचा या शिवाजी पार्कवरील परेडमध्ये सहभाग होता. दिनांक 17 जानेवारी ते 26 जानेवारी 2023 दरम्यान आयोजित करण्यात आले होते.

## २५. राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर – रेवकी

दि. ३ ते ९ फेब्रुवारी २०२३

### सस्नेह निमंत्रण

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड
आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
**'ग्राम विकासासाठी युवा आणि बालविवाह बंदी'**
या संकल्पनेवर आधारित
राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबीर २०२२-२३

**शुक्रवार, दि. ३ ते गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी २०२३**

मौजे रेवकी - देवकी, ता. गेवराई, जि. बीड

प्रति, ____________________

____________________

**निमंत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| प्राचार्य<br>प्रो. रजनी शिखरे | उपप्राचार्य<br>मेजर विजय सांगळे | उपप्राचार्य<br>डॉ. प्रशांत पांगरीकर | आयक्यूएसी समन्वयक<br>डॉ. प्रवीण सोनुने |
| प्रबंधक<br>श्री. बप्पासाहेब पिंपळे | कार्यालयीन अधीक्षक<br>श्री. भागवत गवंडी, | ग्रामपंचायत प्रशासक<br>श्री. बी. जे. राठोड | मुख्याध्यापक<br>श्री. बाळाभाऊ पिंपळे |

**कार्यक्रमाधिकारी**

डॉ. समाधान इंगळे • डॉ. वृषाली गव्हाणे • डॉ. अमोल शिरसाठ
प्रा. चंद्रकांत पुरी • प्रा. शरद सदाफुले

शिबिरार्थी स्वयंसेवक,
सर्व रेवकी-देवकी ग्रामस्थ, सर्व शिक्षकवृंद - जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, रेवकी,
सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी, अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड

**शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०२३**

शिबिरार्थींचे आगमन - गावकरी संवाद

※ रात्री ८ वाजता ※

पारंपारिक भजन - सादरकर्ते - गावकरी भजनी मंडळ, रेवकी-देवकी
एकपात्री प्रयोग - श्री राजुअण्णा अष्टकर

**शनिवार, दि. ४ फेब्रुवारी २०२३**

सकाळी १०:३० वा. उद्घाटन समारंभ

अध्यक्ष - मा.श्री.अमरसिंह पंडित (उपाध्यक्ष, म.शि.प्र.मंडळ, औरंगाबाद)
उद्घाटक - मा. सचिन खाडे (तहसीलदार, गेवराई)
प्रमुख पाहुणे - मा. संदीप काळे (सहा. पोलिस उपनिरीक्षक, गेवराई)
प्रमुख उपस्थिती - मा. दीपक आतकरे (सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
ॲड. हरिश्चंद्र पाटील (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
मा. भगवान मोटे (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
श्री. विजयकुमार मस्के (ग्रामसेवक) | श्री. बाळासाहेब पखाले (मंडळ अधिकारी)

※ रात्री ८ वाजता ※

व्याख्यान
विषय - बालविवाह बंदी - ग्रामविकासात महिलांचे योगदान
वक्ते - कु. शितल साखरे (सरपंच, धोंडराई)
अध्यक्ष - श्रीमती नंदा हिंगे (माजी सरपंच, रानमळा)

※ संगीत रजनी ※
प्रख्यात गायिका श्रीमती रेखा जोशी
अध्यक्ष - श्री. भगवान देवकते, श्री. कमळाजी यमगर

**रविवार, दि. ५ फेब्रुवारी २०२३**

सकाळी १०:३० वा.

शिवार भेट - श्री. रामभाऊ देवकते | प्रमुख उपस्थिती - प्रा. हनमंत हेळंबे, श्री. सुदर्शन निकम

※ रात्री ८ वाजता ※

व्याख्यान - विषय - वर्तमान वास्तव आणि प्रसिद्धी माध्यमे
वक्ते - श्री. गणेश सावंत (माजी सरपंच, उपसंपादक, दैनिक दिव्य मराठी, बीड)
※ सांस्कृतिक कार्यक्रम ※
सादरकर्ते - महाविद्यालयाचे कलावंत विद्यार्थी राहुल कासोदे आणि आकाश म्हस्के
अध्यक्ष - श्री. विलास देवकते, श्री. काशिनाथ बापू सौंदलकर

**सोमवार, दि. ६ फेब्रुवारी २०२३**

सकाळी ९:०० वा. - आरोग्य शिबिर
डॉ. रचना मोटे (समुदाय आरोग्य अधिकारी, रेवकी) आणि सर्व आरोग्य कर्मचारीवर्ग
अध्यक्ष - डॉ. वर्षा जयसिंगपुरे

※ रात्री ८ वाजता ※

कविसंमेलन
※ अध्यक्ष - श्री. प्रकाश भुते • प्रा. सत्यप्रेम लगड • श्री. विलास सोनवणे
श्री. विष्णू खेत्रे • कु. साक्षी वावरे
प्रमुख उपस्थिती - डॉ. सिध्देश्वर सटाले, श्री. कचरू बाबरे

**मंगळवार, दि. ७ फेब्रुवारी २०२३**

दुपारी २.०० वाजता - बौद्धिक
विषय - जीवन 'अर्थ' | वक्ते - डॉ. संदीप वंजारी | अध्यक्ष - डॉ. संदीप बनसोडे

※ रात्री ८ वाजता ※

व्याख्यान
विषय - ग्रामविकास आणि शिवरायांचा दृष्टीकोन
वक्ते - मा. राहुल गिरी (महाराष्ट्रातील प्रसिद्ध युवा व्याख्याते)
अध्यक्ष - श्री. भागवत जाधव
प्रमुख उपस्थिती - श्री. बाळासाहेब मस्के, श्री. देविदास गाडेकर
श्री. रोहिदास नाना सौंदलकर

**बुधवार, दि. ८ फेब्रुवारी २०२३**

दुपारी २.०० वाजता -
बौद्धिक
विषय - सेंद्रिय शेतीची आवश्यकता
वक्ते - डॉ. मीना नागवंशी
प्रमुख उपस्थिती - डॉ. सुदर्शना बढे, श्री. भागवत अष्टकर

※ रात्री ८ वाजता ※

शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी
कलावंतांचे स्नेहसंमेलन
प्रमुख उपस्थिती - मा. संतोष जंजाळ (सहा. पोलिस उपनिरीक्षक, गेवराई)
श्री.सयाजीअण्णा जायभाय, श्री. नवनाथ सौंदलकर, श्री. संभाजी चोरमले

**गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी २०२३**

दुपारी १२.०० वाजता
समारोप समारंभ

अध्यक्ष - ॲड. आनंद सुतार (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
प्रमुख पाहुणे - मा. अजित पवार (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड)
डॉ. सचिन सानप (गट विकास अधिकारी, नरेगा, जिल्हा परिषद, बीड)
डॉ. ओमप्रकाश झंवर (राष्ट्रीय सेवा योजना गट समन्वयक)
मा. जालिंदर पिसाळ (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
मा. गोविंद नरोटे (तलाठी)

**साप्ताहिक कार्यक्रम**

| | | | |
|---|---|---|---|
| स. ६ ते ७ | योगा-व्यायाम | दु. ३ ते ४ | विश्रांती |
| स. ७ ते ८.३० | ग्राम सफाई प्रभात फेरी | दु. ४ ते ५ | विविध खेळ |
| स. ८.३० ते ९ | अल्पोपहार | सायं. ५ ते ६ | गटचर्चा |
| स. ९ ते १२ | श्रमदान | सायं. ६ ते ७ | भोजन |
| स. १२ ते १ | भोजन | रात्री ७ ते १० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| स. १ ते ३ | बौद्धिक सत्र | | |

**शिबीर ध्येय**

ग्राम विकासासाठी युवा आणि बालविवाह बंदी
व्यक्तित्व विकास ※ नेतृत्व गुण विकास
व्यवसायाभिमुख कौशल्यह विकास ※ पर्यावरण संवर्धन
जल संवर्धन ※ वृक्षारोपण आणि संवर्धन
ग्राम स्वच्छता अभियान ※ महिला सक्षमीकरण
आरोग्य जागृती ※ सांस्कृतिक कला गुण विकास
अंधश्रद्धा निर्मूलन ※ समाज उद्बोधन-प्रबोधन
ग्राम संस्कृती संवर्धन ※ साहित्य अभिरुची

## २६. ह.भ.प.प्रभाकर कुटे महाराजांचे भारुड रंगले

दि. ३ फेब्रुवारी २०२३

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिराच्या निमित्ताने रेवकी येथे शिबिराच्या पहिल्या दिवशी रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रातील सुविख्यात भारुडकार तथा प्रबोधनकार ह. भ. प. प्रभाकर महाराज कुटे यांच्या भारुड कार्यक्रमाचे आयोजन करून झाली.

समाज उद्बोधन, प्रबोधन करणारी संतांची भारुडे यावेळी त्यांनी सादर करून शिबिरार्थी स्वयंसेवक आणि गावकरी यांना अंतर्मुख केले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी समाजकार्य करताना घ्यावयाच्या जबाबदाऱ्या त्यांनी सांगितल्या. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, वारकरी भजनी मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी आणि स्वयंसेवक यांची उपस्थिती होती.







## २७. रेवकी येथे सात दिवसीय शिबिराचे उद्घाटन

दि. ४ फेब्रुवारी २०२३












झुंजार नेता | दिनांक : ०३ फेब्रुवारी २०२३ | वार : शुक्रवार | पान ७

### रेवकी येथे अट्टल महाविद्यालयाचे सात दिवसीय रासेयो शिबिराचे आयोजन

गेवराई, दि. ३ (प्रतिनिधी) मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या विद्यमाने आयोजित 'ग्राम विकासासाठी युवा आणि बालविवाह बंदी' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर मौजे रेवकी - देवकी, ता. गेवराई, जि. बीड येथे शुक्रवार, दि. ३ ते गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वा. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ होणार असून उद्घाटक म्हणून तहसीलदार सचिन खाडे हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलिस उपनिरीक्षक संदीप काळे उपस्थित राहणार आहेत. ग्रामसेवक श्री. विजयकुमार स्के, मंडळ अधिकारी पखाले यांच्यासह ग्रामस्थ व महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी यांचीही उपस्थिती असेल. याच दिवशी रात्री ८ वाजता 'बालविवाह बंदी: ग्रामविकासात महिलांचे योगदान' या विषयावर कु. शितल साखरे (सरपंच, धोंडराई) या मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी नंदा हिंगे (माजी सरपंच, रानमळा) उपस्थित राहणार असून प्रख्यात गायिका श्रीमती रेखा जोशी यांची संगीत रजनी रंगणार आहे. रविवार, दि. ५ फेब्रुवारी सकाळी १० वाजता शिवार भेटीचे आयोजन करण्यात आले असून रामभाऊ देवकते हे प्रगतिशील शेतकरी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करणार आहेत. याच दिवशी रात्री ८ वाजता माजी सरपंच, उपसंपादक गणेश सावंत यांचे 'आजचे वर्तमान आणि प्रसिद्धी माध्यमे' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर महाविद्यालयाचे कलावंत विद्यार्थी राहुल कासोदे आणि आकाश म्हस्के यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. सोमवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता डॉ. रचना मोटे (समुदाय आरोग्य अधिकारी, रेवकी) आणि सर्व आरोग्य कर्मचारीवर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले असून विविध आजारांवर तपासणी व उपचार केले जाणार आहेत. रात्री ८ वाजता सुप्रसिद्ध कवी प्रकाश भुते यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन होणार असून प्रा. सत्यप्रेम लगड, शाहीर विलास सोनवणे, विष्णू खेत्रे, कु. साक्षी वावरे या कवींचा सहभाग असणार आहे. मंगळवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता 'सेंद्रिय शेतीची आवश्यकता' या विषयावर डॉ. मीना नागवंशी मार्गदर्शन करणार आहेत. तर रात्री ८ वाजता प्रसिद्ध युवा व्याख्याते राहुल गिरी हे 'ग्रामविकास आणि शिवरायांचा दृष्टीकोन' या विषयावर संवाद साधणार आहे. यावेळी अध्यक्ष म्हणून पत्रकार भागवत जाधव हे उपस्थित राहणार आहेत. बुधवार, दि. ८ फेब्रुवारी दुपारी २ वाजता बौद्धिक सत्रात 'जीवन 'अर्थ' या विषयावर डॉ. संदीप वंजारी आणि डॉ. संदीप बनसोडे हे मार्गदर्शन करतील तर रात्री ८ वाजता शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी कलावंतांचे स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलिस उपनिरीक्षक संतोष जंजाळ उपस्थित राहतील. गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी दुपारी १२ वाजता ड. आनंद सुतार यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ पार पडणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून बीड येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार, नरेगा, जिल्हा परिषदगट विकास अधिकारी डॉ. सचिन सानप, राष्ट्रीय सेवा योजना गट समन्वयक डॉ. ओमप्रकाश झंवर, तलाठी गोविंद नरोटे यांची उपस्थिती राहणार आहे. या शिबिरातील उपक्रमात गावातील व पंचक्रोशीतील मंडळी यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांनी केले. शिबिर संयोजनामध्ये उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, प्रबंधक बप्पासाहेब पिंपळे, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी, ग्रामपंचायत प्रशासक श्री. बी. जे. राठोड, केंद्रीय मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे आदींचे सहकार्य लाभले असून कार्यक्रमाधिकारी, डॉ. समाधान इंगळे, डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. अमोल शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पुरी, प्रा. शरद सदाफुले यांच्या नेतृत्वात योग प्राणायाम, श्रमदान, वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता, जलसंवर्धन, आरोग्य तपासणी, खेळ, बालविवाह बंदी समुपदेशन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी होणार आहेत. स्वयंसेवक शिबिरार्थी, ग्रामस्थ, अट्टल महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांची उपस्थिती शिबिरादरम्यान विविध उपक्रमातून असणार आहे.



झुंजार नेता

### हुंडा देणे - घेणे कुप्रथेचे उच्चाटन युवकांनी करावे - सचिन खाडे

गेवराई, दि ४ (प्रतिनिधी) - 'सर्व दानांमध्ये श्रमदान सर्वश्रेष्ठ दान आहे. कारण ज्यामध्ये देणारा आणि घेणारा असा दोघांना ही लाभ होत असतो. समाजात आजही जात धर्मावरून अनावश्यक वाद वाढवले जातात. जातीला अनाठायी प्राधान्य देणे हे अज्ञानीपणाचे लक्षण आहे. विवाहप्रसंगी हुंडा देणे - घेणे ही घातक कुप्रथा आहे. 'बालविवाह बंदी' करताना यासंदर्भातले समुपदेशन विवाहपूर्वीच होणे आवश्यक असते. यामध्ये युवकांचा सहभाग आणि जबाबदारी अधिक आहे, असे प्रतिपादन तहसीलदार सचिन खाडे यांनी केले. रेवकी- देवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना ७ दिवसीय निवासी शिबिराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित र.भ.अट्टल महाविद्यालय गेवराई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवकांचे ग्रामविकासातील योगदानाने बालविवाह बंदी या संकल्पनेवर आधारित ७ दिवासीय निवासी शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली रेवकी येथे संपन्न झाले . याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलीस निरीक्षक संदीप काळे यांची उपस्थिती होती. त्यांनी बालविवाह बंदी विषयक घटना आणि त्यावरील उपाय योजना संदर्भात अनेक उदाहरणे देऊन त्याचे महत्त्व आणि वस्तुस्थिती विद्यार्थ्यांसमोर सांगताना त्यावरील उपाय योजनाही सांगितल्या. यावेळी ग्रामसेवक विजयकुमार मस्के, मंडळ अधिकारी बाळासाहेब पखाले, तलाठी गोविंद नरोटे, जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे, विलास देवकते, सयाजी जायभाय, राजू अष्टकर, कमळाजी यमगर, कचरू बाबरे, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांनी महाविद्यालय आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयाचा अनुभव सांगत शिबिराच्या आयोजनामागील उद्दिष्ट सांगितले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. तर प्रा. शरद सदाफुले यांनी आभार मानले. यावेळी शरद मोटे आणि संध्या तळतकर या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांचे प्रजासत्ताक पथ संचलनामध्ये मुंबई येथे सहभागी झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. अमोल शिरसाट, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. चंद्रकांत पुरी, उमेश म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.

'सर्व दानांमध्ये श्रमदान सर्वश्रेष्ठ दान आहे. कारण ज्यामध्ये देणारा आणि घेणारा असा दोघांना ही लाभ होत असतो. समाजात आजही जात धर्मावरून अनावश्यक वाद वाढवले जातात. जातीला अनाठायी प्राधान्य देणे हे अज्ञानीपणाचे लक्षण आहे. विवाहप्रसंगी हुंडा देणे - घेणे ही घातक कुप्रथा आहे. 'बालविवाह बंदी' करताना यासंदर्भातले समुपदेशन विवाहपूर्वीच होणे आवश्यक असते. यामध्ये युवकांचा सहभाग आणि जबाबदारी अधिक आहे' असे प्रतिपादन गेवराई येथील तहसीलदार सचिन खाडे यांनी केले. रेवकी- देवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवकांचे ग्रामविकासातील योगदानाने बालविवाह बंदी या संकल्पनेवर

आधारित सात दिवासीय निवासी शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली रेवकी येथे संपन्न झाली याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलीस निरीक्षक संदीप काळे यांची उपस्थिती होती. त्यांनी बालविवाह बंदी विषयक घटना आणि त्यावरील उपाय योजना संदर्भात अनेक उदाहरणे देऊन त्याचे महत्त्व आणि वस्तुस्थिती विद्यार्थ्यांसमोर सांगताना त्यावरील उपाय योजनाही सांगितल्या.

यावेळी ग्रामसेवक विजयकुमार मस्के,मंडळ अधिकारी बाळासाहेब पखाले,तलाठी गोविंद नरोटे जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे, विलास देवकते, सयाजी जायभाय, राजू अष्टकर, कमळाजी यमगर, कचरू बाबरे, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी, यांची उपस्थिती होती.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांनी महाविद्यालय आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयाचा अनुभव सांगत शिबिराच्या आयोजना मागील उद्दिष्ट सांगितले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. तर प्रा. शरद सदाफुले यांनी आभार मानले. यावेळी शरद मोटे आणि संध्या तळतकर या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांचे प्रजासत्ताक पथ संचलनामध्ये मुंबई येथे सहभागी झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. अमोल शिरसाट, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. चंद्रकांत पुरी, उमेश म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.



## २८. पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करावा - शितल साखरे
## व्याख्यान आणि सांस्कृतिक कार्यक्रम

दि. ४ फेब्रुवारी २०२३

'महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून समोर येणे आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय महिलांच्या उद्धारासाठी दुसरा मार्ग नाही. त्यामुळे मुलींनी बालविवाहाला विरोध करून उच्चशिक्षण घ्यावे. समाजाचे आणि पालकांचे मुलींविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी मुलींनीच पुढाकार घ्यावा. पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करून स्वतःला सिद्ध करावे. माझा बालविवाह झाला नाही. मला राजकारण करताना महिलांची साथ मिळाली आणि म्हणून मी सरपंच होऊ शकले' असे प्रतिपादन धोंडराई येथील सरपंच कु. शितल साखरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर मौजे रेवकी - देवकी येथे 'बालविवाह बंदी आणि ग्रामविकासात महिलांचे योगदान' या विषयावर त्या बोलत होत्या.

रानमळा येथील माजी सरपंच नंदा हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर सुप्रसिद्ध गायिका रेखा जोशी आणि गायक सुनील मुंडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. एकाहून एक सरस चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी गावकऱ्यांना या निमित्ताने मिळाली. 'इतनी शक्ती हमे देना दाता' या प्रार्थनेनंतर 'अधीर मन झाले', 'रुपेरी वाळूत', 'निसर्ग राजा' अशी बहारदार गाणी सादर झाल्यानंतर 'ऐ मेरे वतन के लोगो जरा आँख में भरलो पानी, जो शहीद हुए हैं उनकी जरा याद करो कुर्बानी' या गीताने समारोप करताना मैफलीत देशभक्तीचे चैतन्य निर्माण झाले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून भगवान देवकते व कमळाजी यमगर, प्रा. संदीपान हिंगे यांच्यासह मोठ्या संख्येने गावकऱ्यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरार्थींनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभार, प्रास्ताविक केले. नेहमीप्रमाणे राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.









दिव्य मराठी | बीड जिल्हा 07-02-2023

### पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करावा : शीतल साखरे

प्रतिनिधी | गेवराई

महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून समोर येणे आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय महिलांच्या उद्धारासाठी दुसरा मार्ग नाही. त्यामुळे मुलींनी बालविवाहाला विरोध करून उच्चशिक्षण घ्यावे. समाजाचे आणि पालकांचे मुलींविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी मुलींनीच पुढाकार घ्यावा. पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करून स्वतःला सिद्ध करावे. माझा बालविवाह झाला नाही. मला राजकारण करताना महिलांची साथ मिळाली आणि म्हणून मी सरपंच होऊ शकले असे प्रतिपादन धोंडराई येथील सरपंच शीतल साखरे यांनी केले.

र. भ. अट्टल महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयोचे सात दिवसीय निवासी शिबिर रेवकी - देवकी येथे सुरु असून यावेळी बालविवाह बंदी आणि ग्राम विकासात महिलांचे योगदा या विषयावर साखरे बोलत होत्या. रानमळा येथील माजी सरपंच नंदा हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर गायिका रेखा जोशी, गायक प्रा. सुनील मुंडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. एकाहून एक सरस चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी गावकऱ्यांना या निमित्ताने मिळाली. 'इतनी शक्ती हमे देना दाता' या प्रार्थनेनंतर 'अधीर मन झाले', 'रुपेरी वाळूत', 'निसर्ग राजा' अशी बहारदार गाणी सादर झाल्यानंतर 'ऐ मेरे वतन के लोगो जरा आँख में भरलो पानी, जो शहीद हुए हैं उनकी जरा याद करो कुर्बानी' या गीताने समारोप करताना मैफलीत देशभक्तीचे चैतन्य निर्माण झाले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून भगवान देवकते व कमळाजी यमगर, प्रा. संदीपान हिंगे यांच्यासह मोठ्या संख्येने गावकऱ्यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरार्थींनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन, आभार, प्रास्ताविक केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

रासेयो शिबिरात बोलताना शीतल साखरे.



झुंजार नेता | दिनांक : ८ फेब्रुवारी २०२३ बुधवार | पान २

### पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करावा–शितल साखरे

गेवराई, दि.७(प्रतिनिधी):- महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून समोर येणे आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय महिलांच्या उद्धारासाठी दुसरा मार्ग नाही. त्यामुळे मुलींनी बालविवाहाला विरोध करून उच्चशिक्षण घ्यावे. समाजाचे आणि पालकांचे मुलींविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी मुलींनीच पुढाकार घ्यावा. पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या राजकारणात महिलांनी हस्तक्षेप करून स्वतःला सिद्ध करावे. माझा बालविवाह झाला नाही. मला राजकारण करताना महिलांची साथ मिळाली आणि म्हणून मी सरपंच होऊ शकले' असे प्रतिपादन धोंडराई येथील सरपंच कु. शितल साखरे यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर मौजे रेवकी - देवकी येथे 'बालविवाह बंदी आणि ग्रामविकासात महिलांचे योगदान' या विषयावर त्या बोलत होत्या. रानमळा येथील माजी सरपंच नंदा हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानाच्या कार्यक्रमानंतर सुप्रसिद्ध गायिका रेखा जोशी आणि गायक सुनील मुंडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. एकाहून एक सरस चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी गावकऱ्यांना या निमित्ताने मिळाली. 'इतनी शक्ती हमे देना दाता' या प्रार्थनेनंतर 'अधीर मन झाले', 'रुपेरी वाळूत', 'निसर्ग राजा' अशी बहारदार गाणी सादर झाल्यानंतर 'ऐ मेरे वतन के लोगो जरा आँख में भरलो पानी, जो शहीद हुए हैं उनकी जरा याद करो कुर्बानी' या गीताने समारोप करताना मैफलीत देशभक्तीचे चैतन्य निर्माण झाले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून भगवान देवकते व कमळाजी यमगर, प्रा. संदीपान हिंगे यांच्यासह मोठ्या संख्येने गावकऱ्यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिरार्थींनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभार, प्रास्ताविक केले. नेहमीप्रमाणे राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## २९. शिवार भेटीत विद्यार्थ्यांनी केली ई - पीक नोंदणी

दि. ५ फेब्रुवारी २०२३








रिपोर्टर

Tuesday 07-02-2023

**शिवार भेटीत विद्यार्थ्यांनी केली ई -पीक नोंदणी**

गेवराई, (रिपोर्टर) मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने रेवकी - देवकी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर दरम्यान प्रगतिशील शेतकरी रामभाऊ देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली शिवार भेटीचे आणि शिवार संवादाचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीत तलाठी गोविंद नरवटे यांनी सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना शासनाच्या ई-पीक पच्या माध्यमातून पीक नोंदणी, पीक तपासणी, पीक नोंदणीचे महत्त्व, फायदे आणि तोटे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. पीक पाहणी या पच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा मिळणारा अल्प प्रतिसाद आणि त्यामुळे होणारे नुकसान याविषयीही तलाठी त्यांनी मार्गदर्शन केले. या प्रक्रियाशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न विद्यार्थ्यांनी चर्चेतून समजून घेतले, तर शेतकरी रामभाऊ देवकते यांच्याशी पीक पद्धती याविषयी विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने अनेक बाबी समजून घेऊन शेती उत्पादनातील अंमलात आणावयाच्या महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा केली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून अट्टल महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. हनमंत हेळंबे तसेच महाविद्यालयाचे प्रशासकीय कर्मचारी सुदर्शन निकम यांची उपस्थिती होती. शिवार समजून घेणे, शिवारातील पीक समजून घेणे, शेतीमधील अर्थकारण समजून घेणे या हेतूंनी भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे मात्र खेड्यांची दिनचर्या, उपजीविका, सण समारंभ आणि संपूर्ण संस्कृती ही शेत - शिवारावर आधारित आहे. त्यामुळे भारत समजून घेताना भारताचे शिवार समजून घेणे जास्त महत्त्वाचे आहे, असे स्वयंसेवकांच्या चर्चेतून निष्पन्न झाले. कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, ज्ञानेश्वर देवकते, भागवत शिंदे यांनी शिवार भेटीच्या आयोजनात पुढाकार घेतला.

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर दरम्यान प्रगतिशील शेतकरी रामभाऊ देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली शिवार भेटीचे आणि शिवार संवादाचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीत तलाठी गोविंद नरवटे यांनी सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना शासनाच्या ई-पीक ॲपच्या माध्यमातून पीक नोंदणी, पीक तपासणी, पीक नोंदणीचे महत्त्व, फायदे आणि तोटे याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. पीक पाहणी या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा मिळणारा अल्प प्रतिसाद आणि त्यामुळे होणारे नुकसान याविषयीही तलाठी त्यांनी मार्गदर्शन केले. या प्रक्रियाशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न विद्यार्थ्यांनी चर्चेतून समजून घेतले, तर शेतकरी रामभाऊ देवकते यांच्याशी पीक पद्धती याविषयी विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने अनेक बाबी समजून घेऊन शेती उत्पादनातील अंमलात आणावयाच्या महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा केली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून अट्टल महाविद्यालयाचे लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. हनमंत हेळंबे तसेच महाविद्यालयाचे प्रशासकीय कर्मचारी सुदर्शन निकम यांची उपस्थिती होती. शिवार समजून घेणे, शिवारातील पीक समजून घेणे, शेतीमधील अर्थकारण समजून घेणे या हेतूंनी भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे मात्र खेड्यांची दिनचर्या, उपजीविका, सण समारंभ आणि संपूर्ण संस्कृती ही शेत - शिवारावर आधारित आहे. त्यामुळे भारत समजून घेताना भारताचे शिवार समजून घेणे जास्त महत्त्वाचे आहे, असे स्वयंसेवकांच्या चर्चेतून निष्पन्न झाले. कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, ज्ञानेश्वर देवकते, भागवत शिंदे यांनी शिवार भेटीच्या आयोजनात पुढाकार घेतला.

## ३०. समाजाला जे हवे तेच प्रसिद्ध माध्यमे दाखवतात - गणेश सावंत - व्याख्यान आणि सांस्कृतिक कार्यक्रम

दि. ५ फेब्रुवारी २०२३




'भारतीय संविधानात प्रसिद्धी माध्यमांना चौथा स्तंभ संबोधलेले नाही. मात्र प्रसिद्धी माध्यमांनी स्वत:चे महत्त्व आणि स्वत:चे अस्तित्व सिद्ध करत लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून स्वत:ला स्थापित केले. मात्र सध्याची प्रसिद्धी माध्यमिक ही अतिशय भंपक झालेली असून सातत्याने नकारात्मकतेच्या शोधात असतात. त्याचे कारण असे की, समाजाची अभिरुची नकारात्मक घटनांमध्ये अधिक आहे. समाजालाच सकारात्मक गोष्टी नकोत. त्यामुळे प्रसिद्धी माध्यमे ही समाजाची अभिरुची डोळ्यासमोर ठेवून समाजाला हवे तेच प्रसारित करतात, दाखवतात. समाज माध्यमांना ताळ्यावर आणण्यासाठी समाजाने स्वत:ची अभिरुची बदलून सत्याचा आणि सकारात्मकतेचा आग्रह धरायला पाहिजे. स्वप्न आणि सत्य हे एकमेकांशिवाय अपूर्ण आहे. आपण स्वप्नांच्या खांद्यावर सत्याला उभे करून आभाळाला गवसणी घालू शकतो. आणि या सर्व प्रक्रियेत प्रसिद्धी माध्यमांची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे' असे प्रतिपादन पत्रकार गणेश सावंत यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिरात रेवकी - देवकी येथे 'वर्तमान वास्तव आणि प्रसिद्धी माध्यमे' या विषयावर ते मार्गदर्शन करत होते. 'गावाचा विकास सरकारी निधी देऊन किंवा आमदार - खासदारांनी गावे दत्तक घेऊन, कोट्यावधी रुपयांची लूट करून होणार नाही, तर गावांनी स्वत: मनावर घेतल्याशिवाय कुठलेही गाव कोणीही बदलवू शकत नाही' असेही ते म्हणाले. बँकेचे संचालक विलास देवकते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानानंतर प्रसिद्ध गायक प्रा. आकाश मस्के आणि राहुल कासोदे यांनी उद्बोधन - प्रबोधन करणारी लोकगीते सादर करून गावकऱ्यांची मने जिंकली.

शौचालयाची आवश्यकता, लोकसंख्या, बालविवाह, व्यसनाधीनता अशा विविध विषयांवर आधारित गीते सादर करून कलावंतांनी प्रबोधन केले. मातृप्रेमाने ओथंबलेल्या गीतामुळे तर श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. याप्रसंगी रमेश करांडे, संभाजी शेंद्रे, प्रकाश वाघमारे, सयाजी जायभाये, भगवान देवकते, भाऊसाहेब नरोटे, पत्रकार रामेश्वर राऊत, कृष्णा सौंदलकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाठ, प्रा.शरद सदाफुले यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला श्रोत्यांची उपस्थिती होती. राष्ट्रसेवा ग्रुपच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. शिवम गायकवाड ह्याने सूत्रसंचालन केले, अक्षय बोराडे ह्यांने पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर लक्ष्मण बाबरे ह्याने आभार मानले.



दैनिक महाभारत

Wednesday 2023/02/08

### समाजाला जे हवे तेच प्रसिद्ध माध्यमे दाखवतात - गणेश सावंत

गेवराई/प्रतिनिधी(दै.महाभारत) 'भारतीय संविधानात प्रसिद्धी माध्यमांना चौथा स्तंभ संबोधलेले नाही. मात्र प्रसिद्धी माध्यमांनी स्वत:चे महत्त्व आणि स्वत:चे अस्तित्व सिद्ध करत लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून स्वत:ला स्थापित केले. मात्र सध्याची प्रसिद्धी माध्यमिक ही अतिशय भंपक झालेली असून सातत्याने नकारात्मकतेच्या शोधात असतात. त्याचे कारण असे की, समाजाची अभिरुची नकारात्मक घटनांमध्ये अधिक आहे. समाजालाच सकारात्मक गोष्टी नकोत. त्यामुळे प्रसिद्धी माध्यमे ही समाजाची अभिरुची डोळ्यासमोर ठेवून समाजाला हवे तेच प्रसारित करतात, दाखवतात. समाज माध्यमांना ताळ्यावर आणण्यासाठी समाजाने स्वत:ची अभिरुची बदलून सत्याचा आणि सकारात्मकतेचा आग्रह धरायला पाहिजे.

स्वप्न आणि सत्य हे एकमेकांशिवाय अपूर्ण आहे. आपण स्वप्नांच्या खांद्यावर सत्याला उभे करून आभाळाला गवसणी घालू शकतो. आणि या सर्व प्रक्रियेत प्रसिद्धी माध्यमांची अतिशय महत्वाची भूमिका आहे' असे प्रतिपादन पत्रकार गणेश सावंत यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिरात रेवकी - देवकी येथे 'वर्तमान वास्तव आणि प्रसिद्धी माध्यमे' या विषयावर ते मार्गदर्शन करत होते. 'गावाचा विकास सरकारी निधी देऊन किंवा आमदार - खासदारांनी गावे दत्तक घेऊन, कोट्यावधी रुपयांची लूट करून होणार नाही, तर गावांनी स्वत: मनावर घेतल्याशिवाय कुठलेही गाव कोणीही बदलवू शकत नाही' असेही ते म्हणाले. बँकेचे संचालक विलास देवकते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानानंतर प्रसिद्ध गायक प्रा. आकाश मस्के आणि राहुल कासोदे यांनी उद्बोधन - प्रबोधन करणारी लोकगीते सादर करून गावकऱ्यांची मने जिंकली.

शौचालयाची आवश्यकता, लोकसंख्या, बालविवाह, व्यसनाधीनता अशा विविध विषयांवर आधारित गीते सादर करून कलावंतांनी प्रबोधन केले. मातृप्रेमाने ओथंबलेल्या गीतामुळे तर श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. याप्रसंगी रमेश करांडे, संभाजी शेंद्रे, प्रकाश वाघमारे, सयाजी जायभाये, भगवान देवकते, भाऊसाहेब नरोटे, पत्रकार रामेश्वर राऊत, कृष्णा सौंदलकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाठ, प्रा.शरद सदाफुले यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला श्रोत्यांची उपस्थिती होती. राष्ट्रसेवा ग्रुपच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. शिवम गायकवाड ह्याने सूत्रसंचालन केले, अक्षय बोराडे ह्याने पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर लक्ष्मण बाबरे ह्याने आभार मानले.

## ३१. रासेयो शिबिरात गावकऱ्यांची आरोग्य तपासणी

दि. ६ फेब्रुवारी २०२३

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात रेवकी- देवकी व पंचक्रोशीतील गावकऱ्यांची आरोग्य तपासणी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रचना मोटे आणि आरोग्य कर्मचारी वर्ग यांच्या माध्यमातून करण्यात आली. अट्टल महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विषयाच्या प्रो. वर्षा जयसिंगपुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या आरोग्य शिबिरात मोठ्या संख्येने महिला व पुरुष यांची तपासणी करण्यात आली. तपासणीमधे रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, रक्तातील प्राणवायूचे प्रमाण इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. तपासणीतून निष्पन्न झालेल्या आजारांवर योग्य तो उपचार करण्यात आला. तपासणी दरम्यान २ नवीन उच्च रक्तदाबाचे रूग्ण आढळले, तसेच एक वृद्ध महिला स्वतःच मधुमेहाची औषधी बंद करून तपासणीसाठी आल्या त्यांचे साखरेचे प्रमाण ५६० एवढे निदर्शनास आले. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्याने कुठले धोके होऊ शकतात ह्याचे गांभीर्य त्यांना सांगितले. ४० ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरातील ४० स्वयंसेवक विद्यार्थ्यांची तपासणीही यावेळी करण्यात आली. यावेळी आशा गटप्रवतक रोहिणी डोंगरे, आशा कर्मचारी रेखा कावळे, सीता खेडकर, आशा मदने, सुनिता पटेकर, आरोग्य सेविका अंजली मस्के, अंगणवाडी सेविका ढवळे यांनी डॉ. रचना मोटे यांच्यासह आरोग्य तपासणी पूर्ण केली.

आरोग्य शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. शरद सदाफुले आणि राष्ट्रीय सेवा योजना सेमी सेवकांनी पुढाकार घेतला.


दिव्य मराठी बीड जिल्हा 09-02-2023

रेवकी देवकी येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा मिळाला प्रतिसाद

गेवराई | तालुक्यातील रेवकी देवकी येथे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिराला गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. समुदाय आरोग्य अधिकारी रचना मोटे आणि कर्मचाऱ्यांनी ही आरोग्य तपासणी केली. आर. बी. अट्टल महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विषयाच्या वर्षा जयसिंगपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आरोग्य रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, रक्तातील प्राणवायूचे प्रमाण इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. तपासणी दरम्यान २ नवीन उच्च रक्तदाबाचे रुग्ण आढळले, ४० ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरातील ४० स्वयंसेवक विद्यार्थ्यांची तपासणीही यावेळी करण्यात आली. यावेळी आशा गटप्रवतक रोहिणी डोंगरे, आशा कर्मचारी रेखा कावळे, सीता खेडकर, आशा मदने, सुनिता पटेकर, आरोग्य सेविका अंजली मस्के, अंगणवाडी सेविका ढवळे यांनी डॉ. रचना मोटे यांच्यासह आरोग्य तपासणी पूर्ण केली.आरोग्य शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. शरद सदाफुले आणि राष्ट्रीय सेवा योजना सेमी सेवकांनी पुढाकार घेतला.


महाभारत

Wednesday 2023/02/08

रासेयो शिबिरात गावकऱ्यांची आरोग्य तपासणी

गेवराई/प्रतिनिधी(दै.महाभारत)

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रामविकासासाठी युवा आणि बालविवाह बंदी' या संकल्पनेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात रेवकी- देवकी व पंचक्रोशीतील गावकऱ्यांची आरोग्य तपासणी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रचना मोटे आणि आरोग्य कर्मचारी वर्ग यांच्या माध्यमातून करण्यात आली.

अट्टल महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विषयाच्या प्रो. वर्षा जयसिंगपुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या आरोग्य शिबिरात मोठ्या संख्येने महिला व पुरुष यांची तपासणी करण्यात आली. तपासणीमधे रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, रक्तातील प्राणवायूचे प्रमाण इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. तपासणीतून निष्पन्न झालेल्या आजारांवर योग्य तो उपचार करण्यात आला. तपासणी दरम्यान २ नवीन उच्च रक्तदाबाचे रूग्ण आढळले, तसेच एक वृद्ध महिला स्वतःच मधुमेहाची औषधी बंद करुन तपासणीसाठी आल्या त्यांचे साखरेचे प्रमाण ५६० एवढे निदर्शनास आले. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्याने कुठले धोके होऊ शकतात ह्याचे गांभीर्य त्यांना सांगितले. ४० ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरातील ४० स्वयंसेवक विद्यार्थ्यांची तपासणीही यावेळी करण्यात आली. यावेळी आशा गटप्रवतक रोहिणी डोंगरे, आशा कर्मचारी रेखा कावळे, सीता खेडकर, आशा मदने, सुनिता पटेकर, आरोग्य सेविका अंजली मस्के, अंगणवाडी सेविका ढवळे यांनी डॉ. रचना मोटे यांच्यासह आरोग्य तपासणी पूर्ण केली.आरोग्य शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. शरद सदाफुले आणि राष्ट्रीय सेवा योजना सेमी सेवकांनी पुढाकार घेतला.




## ३२. कविसंमेलन

दि. ६ फेब्रुवारी २०२३

सात दिवसीय निवासी शिबिरात सांस्कृतिक कार्यक्रमाचा चौथा दिवस एकाहून एक सरस कवितांनी रंगला. श्रोत्यांच्या मनाला स्पर्श करणाऱ्या विविध विषयांवरील कविता दाद मिळवून गेल्या. नाट्यकलावंत तथा कवी विष्णुप्रसाद खेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या निमंत्रितांच्या कवी संमेलनात वात्रटीकाकार कवी प्रा. सत्यप्रेम लगड यांच्या चारोळ्यांनी हास्य रसाचा कल्लोळ उडवून देत अंतर्मुख केले. त्यांनी सांगितलेल्या वात्रटिकेत

'सखे मी भ्रष्टाचार
तु लाचखोरी आहेस;
मी मदमस्त टेंडर
तु टक्केवारी आहेस'

प्रचंड दाद मिळवून गेली. विष्णुप्रसाद खेत्रे यांनी बालविवाह बंदी वरील रचना

'नाही नाही म्हणत होते
कितीदा पाया पडले गं
पिवळी धम्मक कळी कोवळी
फुलण्याआधी तुटले गं
निसर्ग किमया साधून गेला
घडायचे ते घडले गं
बागडण्याच्या वयात साजणी
संसारामधी पडले गं'

सादर केली. सुदर्शन निकम यांच्या सखीच्या दारावरून जाणाऱ्या कवीच्या प्रेत यात्रेच्या भावनेला युवकांनी विशेष दाद दिली. कवयित्री साक्षी वावरे ह्यांनी ग्रामीण भागाचे बदललेले आंतरबाह्य रूप रेखाटताना समृद्ध - संपन्न गावांची वर्तमान काळातील शोककळा शब्दातून चितारली. त्यांच्या

'आता बदललाय काळ
नवनवं आलंय टेक्निक
पिठलं भाकरी खाण्यासाठी
निघू लागल्यात पीकनीक'

या कवितेने गावकऱ्यांना भूतकाळात डोकवायला भाग पाडले.

कवी शाहीर विलास सोनवणे यांची मसान ही कविता ही लावून टाकणारी होती. संविधानामुळे मसान झालेले जगणे आसान झाल्याचा सकारात्मक भाव कवितेला उंचीवर घेऊन गेला. रेवकी येथील कवी राजू अष्टकर यांनी गावातील पती-पत्नीच्या नावावर आधारित रचना सादर करून कवी संमेलनात वाहवा मिळवली. स्थानिक कवी भीमराव गावडे यांनी कवी संमेलनाच्या सुरुवातीला स्वरचित 'दारुची बाटली' ही कविता सादर करून प्रबोधन केले. सूत्रसंचालक समाधान इंगळे यांनी कवी संमेलनाचा शेवट करताना विडंबन कविता सादर केली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. कवी संमेलनाचे प्रास्ताविक प्रा. शरद सदाफुले यांनी केले. स्वागत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर राऊत आणि सलमान शेख यांनी केले, तर आभार चंद्रकांत साळवे याने मानले. यावेळी मंचावर रोहिदास सौंदलकर, विलास देवकते, गुलाबराव भारती आदींची उपस्थिती होती.



दिव्य लोकप्रभा
Sat 11-02-2023
Page No. 7

# गेवराई तालुक्यात कवी संमेलन

**काझी अमान/गेवराई**
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने रेवकी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात सांस्कृतिक कार्यक्रमाचा चौथा दिवस एकाहून एक सरस कवितांनी रंगला. श्रोत्यांच्या मनाला स्पर्श करणाऱ्या विविध विषयांवरील कविता दाद मिळवून गेल्या. नाट्यकलावंत तथा कवी विष्णुप्रसाद खेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या निमंत्रितांच्या कवी संमेलनात वात्रटीकाकार कवी प्रा. सत्यप्रेम लगड यांच्या चारोळ्यांनी हास्य रसाचा कल्लोळ उडवून देत अंतर्मुख केले. त्यांनी सांगितलेल्या वात्रटिकेत
'सखे मी भ्रष्टाचार
तु लाचखोरी आहेस;
मी मदमस्त टेंडर
तु टक्केवारी आहेस' प्रचंड दाद मिळवून गेली.
विष्णुप्रसाद खेत्रे यांनी बालविवाह बंदी वरील रचना
'नाही नाही म्हणत होते
कितीदा पाया पडले गं
पिवळी धम्मक कळी कोवळी
फुलण्याआधी तुटले गं
निसर्ग किमया साधून गेला
घडायचे ते घडले गं
बागडण्याच्या वयात साजणी
संसारामधी पडले गं'
सादर केली.
सुदर्शन निकम यांच्या सखीच्या दारावरून जाणाऱ्या कवीच्या प्रेत यात्रेच्या भावनेला युवकांनी विशेष दाद दिली. कवयित्री साक्षी वावरे ह्यांनी ग्रामीण भागाचे बदललेले आंतरबाह्य रूप रेखाटताना समृद्ध - संपन्न गावांची वर्तमान काळातील शोककळा शब्दातून चितारली. त्यांच्या
'आता बदललाय काळ
नवनवं आलंय टेक्निक
पिठलं भाकरी खाण्यासाठी
निघू लागल्यात पीकनीक' या कवितेने गावकऱ्यांना भूतकाळात डोकवायला भाग पाडले.
कवी शाहीर विलास सोनवणे यांची 'मसान' ही कविता ही लावून टाकणारी होती. संविधानामुळे मसान झालेले जगणे आसान झाल्याचा सकारात्मक भाव कवितेला उंचीवर घेऊन गेला. रेवकी येथील कवी राजू अष्टकर यांनी गावातील पती-पत्नीच्या नावावर आधारित रचना सादर करून कवी संमेलनात वाहवा मिळवली. स्थानिक कवी भीमराव गावडे यांनी कवी संमेलनाच्या सुरुवातीला स्वरचित 'दारूची बाटली' ही कविता सादर करून प्रबोधन केले. सूत्रसंचालक समाधान इंगळे यांनी कवी संमेलनाचा शेवट करताना विडंबन कविता सादर केली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. कवी संमेलनाचे प्रास्ताविक प्रा. शरद सदाफुले यांनी केले. स्वागत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धेश्वर राऊत आणि सलमान शेख यांनी केले, तर आभार चंद्रकांत साळवे याने मानले. यावेळी मंचावर रोहिदास सौंदलकर, विलास देवकते, गुलाबराव भारती आदींची उपस्थिती होती.



## ३३. आदर्श गाव निर्मितीसाठी शिवरायांचा दृष्टिकोन महत्त्वाचा - राहुल गिरी

दि. ७ फेब्रुवारी २०२३

'छत्रपती शिवरायांनी जातीपातीचे राजकारण स्वराज्य कार्यात आड येऊ दिले नाही. शेतकऱ्यांच्या सुरक्षेला आणि सुविधांना स्वराज्यात प्राधान्य दिले होते. शिवरायांचा रायगड आजही तहान भागवण्याचे काम करतो आहे. सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी शिवरायांनी कार्य केले. शेतकऱ्याच्या मिरचीच्या देठालाही हात लावू नये, लाकूड फाटा शेतकऱ्याकडून विकत घ्यावा किंवा परवानगी घेऊनच तोडावा अशी सक्त ताकीद आपल्या फौजेला देणारे छत्रपती शिवाजी महाराज जगातील एकमेव द्वितीय राजे ठरतात त्यामुळे आज आदर्श गावांची निर्मिती करायची असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा आहे' असे प्रतिपादन युवा व्याख्याते राहुल गिरी यांनी केले. र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या रेवकी देवकी येथील आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात च्या शिवरायांचा दृष्टिकोन आणि ग्राम विकास या विषयावर ते बोलत होते. व्याख्यानाचे अध्यक्ष भागवत जाधव यांनी गावाचा विकास घडवून आणण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सांगितले.

इंजिनीयर विष्णू देवकते यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे गावाच्या पातळीवरील आयोजनाचा हेतू आणि उद्दिष्ट सांगून गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर भगवान देवकते,बबन टेहळे रोहिदास सौंदलकर, विलास देवकते सयाजी जायभाय, राजू अष्टकर आदींची उपस्थिती होती. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले संभाजी मुळक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर निखिल कांबळे याने उपस्थितांचे आभार मानले.. या वेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे, डॉ अमोल सिरसाट, प्रा.शरद सदाफुले, यांच्या सह बहुसंख्येने ग्रामस्थ,महिला उपस्थित होत्या.राष्ट्रगीताने कार्यक्रमांची सांगता झाली.


दिव्य मराठी बीड जिल्हा 11-02-2023

बीड. शनिवार, ११ फेब्रुवारी २०२३ | ३

### आदर्श गाव निर्मितीसाठी शिवरायांचा दृष्टिकोन महत्त्वाचा : राहुल गिरी

रेवकी-देवकी येथे रासेयो शिबिरात बोलताना राहुल गिरी.

प्रतिनिधी | गेवराई

छत्रपती शिवरायांनी जातीपातीचे राजकारण स्वराज्य कार्यात आड येऊ दिले नाही. शेतकऱ्यांच्या सुरक्षेला आणि सुविधांना स्वराज्यात प्राधान्य दिले होते. शिवरायांचा रायगड आजही तहान भागवण्याचे काम करतो आहे. सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी शिवरायांनी कार्य केले. शेतकऱ्याच्या मिरचीच्या देठालाही हात लावू नये, लाकूड फाटा शेतकऱ्याकडून विकत घ्यावा किंवा परवानगी घेऊनच तोडावा अशी सक्त ताकीद आपल्या फौजेला देणारे छत्रपती शिवाजी महाराज जगातील एकमेव द्वितीय राजे ठरतात. त्यामुळे आज आदर्श गावांची निर्मिती करायची असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन युवा व्याख्याते राहुल गिरी यांनी केले.र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या रेवकी देवकी येथील आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात च्या शिवरायांचा दृष्टिकोन आणि ग्राम विकास या विषयावर ते बोलत होते. व्याख्यानाचे अध्यक्ष भागवत जाधव यांनी गावाचा विकास घडवून आणण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे असे सांगितले. इंजिनीयर विष्णू देवकते यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे गावाच्या पातळीवरील आयोजनाचा हेतू आणि उद्दिष्ट सांगून गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर भगवान देवकते,बबन टेहळे रोहिदास सौंदलकर, विलास देवकते सयाजी जायभाय, राजू अष्टकर आदींची उपस्थिती होती. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले. संभाजी मुळक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर निखिल कांबळे याने उपस्थितांचे आभार मानले. या वेळी कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे, डॉ अमोल सिरसाट, प्रा.शरद सदाफुले, यांच्या सह बहुसंख्येने ग्रामस्थ,महिला उपस्थित होत्या. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.





## ३४. बौद्धिक सत्रात सखोल चिंतन

दि. ८ फेब्रुवारी २०२३

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरादरम्यान रेवकी येथे दुपारच्या बौद्धिक क्षेत्रात आर्थिक विषयाशी संबंधित 'जीवन अर्थ' या बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. संदीप वंजारी आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप बनसोडे यांनी या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा करताना प्रश्नांना उत्तरे दिली.

तर सेंद्रिय शेतीचे महत्व या विषयावर प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रो. मीना नागवंशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी भौतिकशास्त्र विषयाच्या डॉ. सुदर्शना बढे यांची प्रमुख उपस्थिती होती.













## ३५. स्नेहसंमेलनातून मनोरंजन आणि प्रबोधन

दि. ८ फेब्रुवारी २०२३

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर मौजे रेवकी - देवकी येथे शिबिरार्थी, गावातील विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांनी एकत्रित येऊन चार तास सांस्कृतिक कार्यक्रम करून स्नेहसंमेलन संस्मरणीय केले.

विविध गीतांवर नृत्य, नाटिका, गीत गायन सादर करत ग्रामस्थ कलावंत, विद्यार्थी कलावंत व शिबिरार्थी कलावंतांनी गावकऱ्यांचे मनोरंजन आणि प्रबोधन केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गेवराई पोलीस स्टेशनचे उप पोलीस निरीक्षक श्री. संतोष जंजाळ आणि पोलीस उपनिरीक्षक श्री. भुतेकर यांची उपस्थिती होती. श्री. संतोष जंजाळ यांनी गावकरी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांस्कृतिक जाणीवा विकसित करण्याचे आवाहन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी विशेष अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. रजनी शिखरे आणि त्यांचे पती श्री. श्रीकांत पाटील यांचा गावकऱ्यांच्या वतीने साडीचोळी आहेर देऊन देऊन सत्कार करण्यात आला. सलग तीन वर्षे गावात राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे यशस्वी आयोजन करून, गावात विविध ज्वलंत प्रश्नांवर चर्चा घडवून आणल्याबद्दल आणि गावकऱ्यांचे प्रबोधन करत मनोरंजनही केल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.










३६. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थींचे ग्राम सर्वेक्षण

दि. ८ फेब्रुवारी २०२३

राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिराच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी रेवकी आणि देवकी या दोन गावांचे सर्वेक्षण केले. ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती, राहणीमान, उद्योग, स्वच्छता, शौचालय आदी घटकांवर जोर देण्यात आला.

या सर्वेक्षणातून विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, आरोग्य विषयक बारकाव्यांचा अभ्यास झाला.













३७. रेवकी - देवकी ग्रामस्थांनी केला बालविवाह बंदीचा संकल्प - अट्टल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप
दि. ९ फेब्रुवारी २०२३




शिबिराच्या समारोपप्रसंगी मनरेगाचे गटविकास अधिकारी डॉ. सचिन सानप यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या समारोप समारंभात मोठ्या संख्येने गावकरी, शालेय विद्यार्थी, जिल्हा परिषद

शिक्षक उपस्थित होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी येथे सात दिवस श्रमदानाचे मोल गावकऱ्यांना पटवून दिले. योग- प्राणायाम- व्यायाम, ग्रामस्वच्छता, शिवारभेट, आरोग्य शिबिर व समुपदेशन, विविध विषयांवरील बौद्धिके, खेळ, गटचर्चा, ग्राम सर्वेक्षण आदी उपक्रम राबवताना दररोज रात्री प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम गावकऱ्यांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाले. त्यामुळे गावात एक प्रबोधन सप्ताहाचे वातावरण निर्माण झाले होते. 'बालविवाह बंदी' या विषयावर कवी, कलावंत, व्याख्याते यांच्याकडून सातत्याने मार्गदर्शन झाल्याबद्दल गावकऱ्यांनी बालविवाह बंदीचा संकल्प केला हे या शिबिराचे सर्वात मोठे यश आहे.

रेवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे हे तिसरे वर्ष होते. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. सचिन सानप यांनी मोबाईलचे प्रादुर्भाव आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शरीर व मनावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा आढावा घेताना विद्यार्थ्यांना महाविद्यालय व शाळेत मोबाईल बंदी आणावी, जेणेकरून विद्यार्थी कृतिशील व रचनात्मक कार्यात सहभागी होतील असा संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांनी दत्तक गाव रेवकी ग्रामस्थांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल महाविद्यालयीन तसेच विविध उपक्रमात ग्रामस्थ हिरीरीने सहभागी झाल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार मानले. प्राचार्य शिखरे यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बालविवाह बंदीवर गावात झालेल्या प्रबोधनामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी गावकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून राजू अष्टेकर, बबन टेळे यांनी मनोगत व्यक्त करताना शिबिराचे आयोजन रेवकी येथे झाल्यामुळे गावाचा चेहरा मोहरा बदलून गेल्याचे सांगितले. गावात सिमेंटचे रस्ते, नाल्यांचे बांधकाम, बालविवाह बंदी यासह गावकऱ्यांनी शौचालयाचे महत्त्व जाणून घेतल्याचे मनोगतातून सांगितले. मान्यवरांच्या हस्ते सहभागी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन शरद मोटे व मानसी दिसागज या स्वयंसेवकांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, तर प्रा. शरद सदाफुले यांनी आभार मानले. यावेळी मंचावर राष्ट्रीय सेवा योजना गट समन्वयक डॉ. ओमप्रकाश झंवर, सरपंच जनाबाई चोरमले, सयाजी जायभाये, विलास देवकते, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य प्रशांत पांगरीकर, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी, तलाठी गोविंद नरोटे, ग्राम विकास अधिकारी विजयकुमार मस्के, समाज कल्याण कार्यालय बीडचे प्रतिनिधी मधुसूदन मस्के, कमळाजी यमगर, कचरू बाबरे, मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना निरोप देताना ग्रामस्थ व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी भावुक झाल्याचे चित्र दिसले. गावकऱ्यांच्या वतीने सर्व शिबिरार्थी व पाहुण्यांचा सन्मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. तसेच गावकऱ्यांनी निमंत्रित केलेल्या हलगी पथकाने वातावरणात उत्साह संचारला होता.













दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

11FEB2023

# रेवकी–देवकी ग्रामस्थांनी केला बालविवाह बंदीचा संकल्प

## महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा मोबाईल वापर बंद करावा– डॉ. सचिन सानप

गेवराई, दि.१० (लोकाशा न्युज) : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रामविकासात युवकांचे योगदान आणि बालविवाह बंदी' या संकल्पने अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर मौजे रेवकी– देवकी येथे नुकतेच संपन्न ▶▶ पान ५ वर



झाले. शिबिराच्या समारोपप्रसंगी मनरेगाचे गटविकास अधिकारी डॉ. सचिन सानप यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या समारोप समारंभात मोठ्या संख्येने गावकरी, शालेय विद्यार्थी, जिल्हा परिषद शिक्षक उपस्थित होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी येथे सात दिवस श्रमदानाचे मोल गावकऱ्यांना पटवून दिले. योग– प्राणायाम– व्यायाम, ग्रामस्वच्छता, शिवारभेट, आरोग्य शिबिर व समुपदेशन, विविध विषयांवरील बौद्धिके, खेळ, गटचर्चा, ग्राम सर्वेक्षण आदी उपक्रम राबवताना दररोज रात्री प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम गावकऱ्यांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाले. त्यामुळे गावात एक प्रबोधन सप्ताहाचे वातावरण निर्माण झाले होते. 'बालविवाह बंदी' या विषयावर कवी, कलावंत, व्याख्याते यांच्याकडून सातत्याने मार्गदर्शन झाल्याबद्दल गावकऱ्यांनी बालविवाह बंदीचा संकल्प केला हे या शिबिराचे सर्वात मोठे यश आहे. रेवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे हे तिसरे वर्ष होते. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. सचिन सानप यांनी मोबाईलचे प्रादुर्भाव आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शरीर व मनावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा आढावा घेताना विद्यार्थ्यांना महाविद्यालय व शाळेत मोबाईल बंदी आणावी, जेणेकरून विद्यार्थी कृतिशील व रचनात्मक कार्यात सहभागी होतील असा संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. रजनी शिखरे यांनी दत्तक गाव रेवकी ग्रामस्थांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल महाविद्यालयीन तसेच विविध उपक्रमात ग्रामस्थ हिरीरीने सहभागी झाल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार मानले. प्राचार्य शिखरे यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बालविवाह बंदीवर गावात झालेल्या प्रबोधनामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी गावकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून राजू अष्टेकर, बबन टेळे यांनी मनोगत व्यक्त करताना शिबिराचे आयोजन रेवकी येथे झाल्यामुळे गावाचा चेहरा मोहरा बदलून गेल्याचे सांगितले. गावात सिमेंटचे रस्ते, नाल्यांचे बांधकाम, बालविवाह बंदी यासह गावकऱ्यांनी शौचालयाचे महत्त्व जाणून घेतल्याचे मनोगतातून सांगितले. मान्यवरांच्या हस्ते सहभागी स्वयंसेवकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन शरद मोटे व मानसी दिसागज या स्वयंसेवकांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, तर प्रा. शरद सदाफुले यांनी आभार मानले. यावेळी मंचावर राष्ट्रीय सेवा योजना गट समन्वयक डॉ. ओमप्रकाश झंवर, सरपंच जनाबाई चोरमले, सयाजी जायभाये, विलास देवकते, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य प्रशांत पांगरीकर, कार्यालयीन अधीक्षक भागवत गवंडी, तलाठी गोविंद नरोटे, ग्राम विकास अधिकारी विजयकुमार मस्के, समाज कल्याण कार्यालय बीडचे प्रतिनिधी मधुसूदन मस्के, कमळाजी यमगर, कचरू बाबरे, मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना निरोप देताना ग्रामस्थ व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी भावुक झाल्याचे चित्र दिसले. गावकऱ्यांच्या वतीने सर्व शिबिरार्थी व पाहुण्यांचा सन्मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. तसेच गावकऱ्यांनी निमंत्रित केलेल्या हलगी पथकाने वातावरणात उत्साह संचारला होता.

## ३८. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सहारा अनाथालय, बालग्राम सोबत MoU

भारतीय गैर न्यायिक
एक सौ रुपये Rs. 100
रु. 100 ONE HUNDRED RUPEES
भारत INDIA
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 11AA 792625

28 NOV 2022

दिनांक 6/12/2022

श्री.अ.अ. पाचपुते पाटील
मुद्रांक विक्रेता (प.क्र.15)
ता.गेवराई जि.बीड

NOTARY GOVT.OF INDIA

### Memorandum of Understanding

**Memorandum of Understanding has been signed for collaboration by the**

***Principal, R. B. Attal Arts, Science & Commerce College, Georai*** **and** ***Balgram Sahara Anathalay, Georai***

The present document is being signed to organize social and educational activities.

The following terms and specifications are being laid with mutual understanding for the period 2022-2027:

**General Terms:**

- ***NSS Department*** of the College and ***Balgram Sahara Anathalay, Georai*** will collaboratively organize activities to create awareness in the society
- To organize various activities for the betterment of orphan children.
- To identify the needs and problems of the community and involve them in problem-solving
- The institutes work collaboratively on several aspects of community service.

**.Specifications:**

- ***The Director of Balgram Sahara Anathalay, Georai*** will be a member of the **Advisory Committee** of **NSS Department** of the College.
- ***NSS Volunteers of the College*** will help to collect donation from the society for the ***Balgram Sahara Anathalay, Georai***
- As per the requirement of ***Balgram Sahara Anathalay, Georai***, **NSS Volunteers** will conduct various activities like a Cleanliness Drive in the campus of ***Balgram Sahara Anathalay.***
- ***Balgram Sahara Anathalay, Georai*** will offer opportunity of Internship/ Training in Social Work to the **NSS Volunteers of the College**
- The MoU may be terminated by either party with notification to other party, six months prior to the effective date of termination.

**Place: Georai**

**Date:** 14.12.2022

| Sign: | Sign: | Sign: | Sign: |
| --- | --- | --- | --- |
| Dr. Rajani Shikhare Principal, R. B. Attal College, Georai | Dr. Pravin Sonune Co-ordinator, IQAC, R. B. Attal College, Georai | Dr Samadhan Ingle NSS Programme Officer | Mr. Santosh Garge Director, Balgram Sahara Anathalay, Georai |

PRINCIPAL
R.B.Attal College
Georai Dist.Beed
प्राचार्य